CNRNO.MHLA15000144-2018

## नि.दरखास्त क्र. ०२/२०१८ मधील नि.क्र.२७ खालील आदेश

(विलासराव वि.... बापूराव व इतर)

1. प्रकरणातील धनकोने सदरचा अर्ज ऋणको क्र. १ विरुध्द सदर दरखास्त खारिज (Abate) चा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांनी कायदेशिर वारसदार दाखल करण्यास झालेला विलंब ९ महिने १२ दिवस माफ करण्याबाबत वेगळा अर्ज नि.क्र. २९ खाली दाखल केलेला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, ऋणको क्र. १ बाबुराव नागोराव शिंदे हे दि. १६.०४.२०१९ रोजी चापोली येथे वृध्दापकाळाने मयत झाले. त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दि. ०७.०८.२०१९ रोजी प्राप्त झाले. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. सदरचा विलंब हा जाणीपुर्वक झालेला नाही. दरखास्त ही जंगम मालमत्तेबाबतची आहे. तरी ऋणको क्र. १ विरुध्द सदर दरखास्त खारिज (Abate) चा आदेश रद्द करण्याची त्यांनी विनंती केली.

2. याउलट, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ऋणको क्र. १, ३ ते ५ आणि १० ते १२ हे दि.०६.०९.२०१८ रोजी वकीलामार्फत हजर होऊनही म्हणणे दाखल न केल्याने दि. ११.०७.२०१९ पासून प्रकरण त्यांच्या विरुध्द विना म्हणणे चालविण्यात आले. याउलट, ऋणको क्र.१४ आणि १६ तसेच १९ याना सुध्दा तामीली होऊन ते हजर न झाल्याने त्यांच्या विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले. इतर ऋणकोंना अद्यापपावेतो तामीली होणे बाकी आहे. त्यामुळे ऋणको क्र. १ चे वकील गैरहजर असल्याने त्यांनी कोणतेही म्हणणे सदर अर्जावर दाखल केलेले नाही.

3. याउलट, धनकोच्या वकीलांनी ऋणको क्र. १ ची मृत्यूच्या प्रमाणपत्राची प्रत नि.क्र. २६ वर दाखल केले आहे, त्यावरुन ऋणको क्र. १ चा मृत्यू दि. १६.०४.२०१९ रोजी झालेला दिसून येतो. त्यामुळे इतर ऋणको व त्याचे वकील गैरहजर असल्याने धनकोला त्याच्या ऋणको क्र. १ च्या मृत्यूची बाब उशिरा कळणे तसेच मृत्यू प्रमाणपत्र काढण्यास आणि सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब समर्पक वाटतो. त्यामुळे वाद विषयाचे गुणदोषावर अंतिम निराकरण करण्याकरिता धनकोला शेवटची संधी अटी व शर्तीवर मंजूर करणे नैसर्गीक न्यायाच्या उद्देशाने समर्पक असल्याने वाद विषयांची अनेकता व गुंतागुंत टाळण्यासाठी, सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ प्रस्तुतचा अर्ज रु.१००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. ऋणको क्र. १ यांच्या विरुध्द सदर दरखास्त खारिज (Abate) चा आदेश रद्द करण्यात येतो.

३. सदर रक्कम त्यांनी न्यायालयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Yogesh Dattatray Koinkar
Date: 2020.03.16 17:46:20 +0530

स्थळ– चाकूर **(योगेश डी. कोईनकर)**

दिनांक– १६/०३/२०२० सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, चाकूर